सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार

वर्ष २, अंक ६] बुधवार, एप्रिल २८, २०१०/वैशाख ८, शके १९३२ [पृष्ठे ५, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक १५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११.**—महाराष्ट्र राज्यातील वैद्यकीय सेवा-व्यक्तींबाबत घडणाऱ्या हिंसक कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी आणि वैद्यकीय सेवा-संस्थांच्या मालमत्तेची हानी किंवा नुकसान होण्यास प्रतिबंध करण्यासाठी तसेच तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम. | पृष्ठे<br>१-५ |

दिनांक २८ एप्रिल २०१० रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**<br>
सचिव,<br>
महाराष्ट्र शासन,<br>
विधी व न्याय विभाग.

---

## सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक २८ एप्रिल २०१० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र राज्यातील वैद्यकीय सेवा-व्यक्तींबाबत घडणाऱ्या हिंसक कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी आणि वैद्यकीय सेवा-संस्थांच्या मालमत्तेची हानी किंवा नुकसान होण्यास प्रतिबंध करण्यासाठी तसेच तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्यामध्ये वैद्यकीय सेवा-व्यक्तींच्या जीविताला इजा किंवा धोका निर्माण करणाऱ्या आणि वैद्यकीय सेवा-संस्थांच्या मालमत्तेची हानी किंवा नुकसान करणाऱ्या हिंसक कृत्यांमध्ये वाढ झाली होती,

त्यामुळे वैद्यकीय सेवा-व्यक्ती आणि व्यावसायिक यांच्यामध्ये असंतोष निर्माण झाला होता, परिणामी राज्यातील या सेवांमध्ये मोठा अडथळा येत होता ;

**आणि ज्याअर्थी,** वैद्यकीय सेवा-व्यक्तींबाबतीत घडणाऱ्या हिंसक कृत्यांना प्रतिबंध करणे आणि अशा हिंसाचारातून होणाऱ्या वैद्यकीय सेवा-संस्थांच्या मालमत्तेच्या हानीस किंवा नुकसानीस प्रतिबंध करणे आवश्यक झाले होते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** उपरोक्त प्रयोजनांसाठी, आवश्यक त्या तरतुदी करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १७ फेब्रुवारी २०१० रोजी महाराष्ट्र वैद्यकीय सेवा-व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा-संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) अध्यादेश, २०१० प्रख्यापित केला होता ; २०१० चा महा. अध्या. १.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र वैद्यकीय सेवा-व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा-संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) अधिनियम, २०१० असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, दिनांक १७ फेब्रुवारी २०१० पासून अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या. **२.** या अधिनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(क) " वैद्यकीय सेवा-संस्था " याचा अर्थ, जेथे रुग्णांवर उपचार करण्याची सुविधा असते आणि त्यांना भरती करून घेतले जाते किंवा जेथे सामान्यतः महिलांना बाळंतपणासाठी किंवा प्रसुतीशी संबंधित प्रसवपूर्व वा प्रसवोत्तर देखभालीसाठी अथवा तत्संबंधित प्रकरणांमध्ये भरती करून घेऊन त्यांच्या उपचाराची व्यवस्था करते असे कोणतेही खाजगी रुग्णालय आणि शारीरिक अथवा मानसिक असा कोणताही आजार, दुखापत किंवा दुर्बलता असणाऱ्या व्यक्तींना भरती करून घेऊन त्यांच्या उपचाराची व्यवस्था करण्यासाठी असलेले किंवा तसा उद्देश असलेले आणि औषधोपचार किंवा शुश्रूषा किंवा या दोन्ही बाबी पुरविणारे खाजगी शुश्रूषालय यांसह, एकतर वैद्यकीय सेवा-संस्थेमध्ये किंवा फिरत्या वैद्यकीय पथकामार्फत किंवा वैद्यकीय तपासणी शिबिरे आयोजित करून व्यक्तींना वैद्यकीय सेवा पुरविते अशी, राज्य शासनाच्या अथवा केंद्र सरकारच्या अथवा स्थानिक संस्थेच्या नियंत्रणाखालील एखादी संस्था, असा आहे आणि त्यामध्ये आरोग्यधामाचाही समावेश होतो ;

(ख) वैद्यकीय सेवा-संस्थेच्या संबंधात " वैद्यकीय सेवा-व्यक्ती " यामध्ये,—

(एक) भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक नाही असा, वैद्यकीय सेवा-संस्थेमध्ये काम करणारा नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायी, व्यवसायी किंवा नोंदणीकृत व्यवसायी (तात्पुरती नोंदणी झालेल्या व्यवसायींसह) ; १८६० चा ४५.

(दोन) महाराष्ट्र परिचारिका अधिनियम, १९६६ अन्वये जिची नोंदणी झालेली असेल, आणि भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत जी लोकसेवक नसेल अशी नोंदणीकृत परिचारिका ; १९६६ चा महा. ४०. १८६० चा ४५.

(तीन) वैद्यकीय विद्यार्थी ;

(चार) परिचर्या विद्यार्थी ; आणि

१८६० चा ४५. (पाच) भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक नसेल असा, निम-वैद्यकीय आरोग्यसेवक आणि आवश्यक त्या सुविधा पुरविण्यासाठी वैद्यकीय सेवा सदस्य संस्थेकडून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या कामावर घेतलेला अन्य सदस्य कर्मचारी किंवा आरोग्यसेवक,

यांचा समावेश होईल.

१९६१ चा महा. २८. १९६५ चा महा. ४६. १९६० चा मुंबई १२. १९६६ चा महा. ४०.

**स्पष्टीकरण.**—या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायी, व्यवसायी, नोंदणीकृत व्यवसायी, परिचारिका यांना महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५, मुंबई समचिकित्सा वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९५९ आणि महाराष्ट्र परिचारिका अधिनियम, १९६६, यांमध्ये जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील ;

(ग) " वैद्यकीय विद्यार्थी " याचा अर्थ, जो वैद्यकीय व्यवसायाचे प्रशिक्षण घेत असेल किंवा त्या व्यवसायाचा अभ्यास करीत असेल, असा विद्यार्थी, असा आहे ;

(घ) " फिरते वैद्यकीय पथक " याचा अर्थ, वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी वापरण्यात येणारी, वैद्यकीय साधनसामग्रीने सुसज्ज असलेली रुग्णवाहिका, असा आहे ;

(ङ) " परिचर्या विद्यार्थी " याचा अर्थ, जो शुश्रूषा व्यवसायाचे प्रशिक्षण घेत असेल किंवा त्या व्यवसायाचा अभ्यास करीत असेल, असा विद्यार्थी, असा आहे ;

(च) " अपराधी " याचा अर्थ, जी व्यक्ती एकतर स्वतः किंवा व्यक्तींच्या गटाचा किंवा संघटनेचा एक सदस्य किंवा नेता या नात्याने, या अधिनियमाखालील हिंसाचाराचे कृत्य करील, ते करण्याचा प्रयत्न करील किंवा त्यास अपप्रेरणा किंवा चिथावणी देईल, अशी कोणतोही व्यक्ती, असा आहे ;

(छ) " निम-वैद्यकीय आरोग्यसेवक " याचा अर्थ, वैद्यकीय सेवा देणाऱ्या वैद्यकीय सेवा-व्यक्तीस सहाय्य करणारी व्यक्ती, असा आहे ;

(ज) " मालमत्ता " याचा अर्थ, कोणत्याही वैद्यकीय सेवा-व्यक्तीच्या किंवा वैद्यकीय सेवा-संस्थेच्या मालकीची असलेली, किंवा त्यांच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेली, कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता किंवा वैद्यकीय साधनसामग्री किंवा वैद्यकीय यंत्रसामग्री, असा आहे ;

(झ) " हिंसाचार " याचा अर्थ, ज्या कृत्यामुळे, वैद्यकीय सेवा-संस्थेतील कोणत्याही वैद्यकीय सेवा-व्यक्तीच्या जीवितास कोणतीही इजा, क्षती किंवा धोका पोहोचेल किंवा पोहोचू शकेल, किंवा अशी व्यक्ती आपले कर्तव्य बजावीत असताना जिला धाकदपटशा करण्यात येईल, अडवण्यात येईल किंवा तिच्या कामात अडथळा आणण्यात येईल किंवा एखाद्या वैद्यकीय सेवा-संस्थेच्या मालमत्तेला हानी किंवा नुकसान पोहोचेल किंवा पोहोचू शकेल असे कृत्य, असा आहे.

**३.** वैद्यकीय सेवा-व्यक्तीविरुद्धच्या कोणत्याही हिंसाचाराच्या किंवा वैद्यकीय सेवा-संस्थेच्या मालमत्तेची हानी किंवा नुकसान करण्याच्या कृत्यास प्रतिबंध करण्यात येईल. हिंसाचारास प्रतिबंध करणे.

**४.** जो, कलम ३ च्या तरतुदींचे उल्लंघन करून हिंसाचाराचे कोणतेही कृत्य करील किंवा करण्याचा प्रयत्न करील किंवा ते करण्यास अपप्रेरणा किंवा चिथावणी देईल अशा कोणत्याही अपराध्यास, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कारावासाची आणि पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा करण्यात येईल. शास्ती.

अपराधाची दखल.

**५.** या अधिनियमाखाली केलेला कोणताही अपराध, दखलपात्र व अजामीनपात्र असेल आणि तो, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्याच्या न्यायालयाकडून न्याय चौकशी करण्यायोग्य असेल.

मालमत्तेला झालेल्या हानी किंवा नुकसानीची भरपाई देण्याचे दायित्व.

**६.** (१) कलम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षेव्यतिरिक्त, अपराधी, कलम ५ मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे न्यायालयाकडून निर्धारित करण्यात येईल अशा, मालमत्तेच्या झालेल्या हानीच्या किंवा नुकसानीच्या दुप्पट रकमेइतकी नुकसानभरपाई देण्यास पात्र असेल.

(२) जर अपराध्याने, पोट-कलम (१) अन्वये लादलेली भरपाई दिली नसेल तर, ती रक्कम, जणू काही ती जमीन महसुलाची थकबाकी होती, असे समजून, वसूल करण्यात येईल.

वैद्यकीय निष्काळजी-पणामुळे बळी पडलेल्यांना साह्य व सल्ला देणारे प्राधिकरण.

**७.** (१) वैद्यकीय निष्काळजीपणामुळे किंवा गैरव्यवस्थापनामुळे बळी पडलेल्यांची गाऱ्हाणी ऐकण्यासाठी आणि योग्य अनुतोष मिळण्याकरिता समुचित मंचाचा त्यांनी अवलंब करावा यासाठी त्यांना साह्य व सल्ला देण्यासाठी राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्राकरिता, प्राधिकरणाची स्थापना करील.

(२) असे प्राधिकरण, वैद्यकीय, कायदा, ग्राहक चळवळ आणि आरोग्य व्यवस्थापन या क्षेत्रांतील तज्ज्ञांचे मिळून बनलेले असेल.

(३) पोट-कलम (२) मध्ये निर्देशिलेल्या तज्ज्ञांच्या सेवा शर्ती आणि प्राधिकरणाने अनुसरावयाची कार्यपद्धती ही राज्य शासन, या बाबतीत आदेशाद्वारे, विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे असेल.

अधिनियम, इतर कोणत्याही कायद्याचे न्यूनीकरण करणार नाही.

**८.** या अधिनियमाच्या तरतुदी ह्या, त्या-त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींव्यतिरिक्त असतील आणि त्यांचे न्यूनीकरण करणाऱ्या नसतील.

२०१० च्या महा. अध्या. १. **९.** (१) महाराष्ट्र वैद्यकीय सेवा-व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) अध्यादेश, २०१०, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. सन २०१० च्या महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १ याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यांसह) ही, या अधिनियमाच्या संबंधित तरतुदींअन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा आदेश असल्याचे मानण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष २, अंक १६]  बुधवार, एप्रिल २८, २०१०/वैशाख ८, शके १९३२  [पृष्ठे ४, किंमत : रुपये १९.००

असाधारण क्रमांक ३६

प्राधिकृत प्रकाशन


महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (*3*) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Medicare Service Persons and Medicare Service Institutions (Prevention of Violence and Damage or Loss to Property) Act, 2010 (Mah. Act No. XI of 2010), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XI OF 2010.

(First published, after having received the assent of the Governor in the "*Maharashtra Government Gazette*", on the 28th April 2010.)

An Act to provide for the prevention of violence against Medicare Service Persons and prevention of damage or loss of property of Medicare Service Institutions in the State of Maharashtra and for matters connected therewith or incidental thereto.

WHEREAS acts of violence of causing injury or danger to life of Medicare Service Persons and damage or loss to the property of Medicare Service Institutions were on increase in the State creating unrest in Medicare Service Persons and professionals resulting in total hindrance of such services in the State ;

AND WHEREAS it had become necessary to provide for the prevention of violence against Medicare Service Persons and prevention of damage or loss of property of Medicare Service Institutions from such violent activities ;

AND WHEREAS both Houses of the State Legislature were not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action to make necessary provisions, for the purposes aforesaid ; and, therefore, promulgated the Maharashtra Medicare Service Persons and Medicare Service Institution (Prevention of Violence and Damage or Loss to Property) Ordinance, 2010, on the 17th February 2010 ; Mah. Ord. I of 2010.

AND WHEREAS it is expedient to replace the said Ordinance by an Act of the State Legislature ; it is hereby enacted in the Sixty-first Year of the Republic of India as follows :—

Short title, extent and commencement. 1. (*1*) This Act may be called the Maharashtra Medicare Service Persons and Medicare Service Institutions (Prevention of Violence and Damage or Loss to Property) Act, 2010.

(*2*) It extends to the whole of the State of Maharashtra.

(*3*) It shall be deemed to have come into force on the 17th February 2010.

Definitions. **2.** In this Act, unless the context otherwise requires,—

(*a*) " Medicare Service Institution " means an institution, providing medicare service to people either in Medicare Service Institution or through Mobile Medicare Unit or by arranging medical check up camps, under the control of the State Government or the Central Government, or a local body including any private hospital having facilities for treatment of the sick and used for their reception or stay in any private maternity home, where women are usually received and accommodated for the purpose of confinement and ante-natal and post-natal care in connection with the child birth or anything connected therewith and any private nursing home used or intended to be used for the reception and accommodation of person suffering from any sickness, injury or infirmity, whether of body or mind, and providing of treatment or nursing or both of them and includes convalescent home ;

(*b*) " Medicare Service Person", in relation to Medicare Service Institution, shall include,—

(*i*) Registered Medical Practitioner, Practitioner or Registered Practitioner (including a person having provisional registration) working in a Medicare Service Institution other than the public servant within the meaning of section 21 of the Indian Penal Code ; 45 of 1860.

Mah. XL of 1966. 45 of 1860.

(*ii*) Registered Nurse, registered under the Maharashtra Nurses Act, 1966, other than the public servant within the meaning of section 21 of the Indian Penal Code ;

(*iii*) Medical Student ;

(*iv*) Nursing Student ; and

(*v*) Para-Medical Worker and other member staff or worker directly or indirectly employed by a Medicare Service Institution for providing required services other than the public servant within the meaning of section 21 of the Indian Penal Code.

45 of 1860.

*Explanation*.—For the purpose of this Act, the expression Registered Medical Practitioner, Practitioner or Registered Practitioner, Nurse, shall have the same meanings, as assigned to them in the Maharashtra Medical Practitioners' Act, 1961, the Maharashtra Medical Council Act, 1965, the Bombay Homoeopathic Practitioners' Act, 1959 and the Maharashtra Nurses Act, 1966 ;

Mah. XXVIII of 1961. Mah. XLVI of 1965. Bom. XII of 1960. Mah. XL of 1966.

(*c*) " Medical Student " means a student, who is undergoing training or studies in medical profession ;

(*d*) " Mobile Medical Unit " means an ambulance equipped with medical equipment, used for providing medicare services ;

(*e*) " Nursing Student " means a student, who is undergoing training or studies in nursing profession ;

(*f*) " Offender " means any person, who either by himself or as a member or leader of a group of persons or organization commits or attempts to commit or abets or incites the commission of violence under this Act ;

(*g*) " Para-Medical Worker " means a person, who assists the Medicare Service Person providing medicare services ;

(*h*) " Property " means any property, movable or immovable or medical equipment or medical machinery owned by or in possession of, or under the control of any Medicare Service Person or Medicare Service Institution ;

(*i*) " Violence " means an act, which causes or may cause any harm, injury or endangering the life of, or intimidation, obstruction or hindrance to, any Medicare Service Person in discharging his duty in a Medicare Service Institution or causing damage or loss to the property in a Medicare Service Institution.

Prohibition of violence.

**3.** Any act of violence against a Medicare Service Person or damage or loss to the property in a Medicare Service Institution, shall be prohibited.

Penalty. **4.** Any offender, who commits or attempts to commit or abets or incites the commission of any act of violence in contravention of the provisions of section 3, shall be punished with imprisonment which may extend to three years and with fine, which may extend to fifty thousand rupees.

Cognizance of offence. **5.** Any offence committed under this Act, shall be cognizable and non-bailable and triable by the Court of Judicial Magistrate of the First Class.

Liability to pay compensation for loss or damage caused to property. **6.** *(1)* In addition to the punishment specified in section 4, the offender shall be liable to pay compensation of twice the amount of damage or loss caused to the property, as may be determined by the Court referred to in section 5.

*(2)* If the offender has not paid the compensation imposed under sub-section *(1)*, the same sum shall be recovered as if it were an arrear of land revenue.

Authority to aid and advise victims of medical negligence. **7.** *(1)* The State Government shall, by notification in the *Official Gazette*, establish the Authority for the area as may be specified in such notification, to hear grievances of victims of medical negligence or mismanagement and to aid and advise such victims for taking recourse to an appropriate forum for suitable relief.

*(2)* The Authority shall consist of experts one each from the field of medical, law, consumer movement and health management.

*(3)* The conditions of service of the experts mentioned in sub-section *(2)*, and the procedure to be followed by the Authority shall be such as may be specified by the State Government by an order in this behalf.

Act not in derogation of any other law. **8.** The provisions of this Act shall be in addition to and not in derogation of, the provisions of any other law for the time being in force.

Repeal of Mah. Ord. I of 2010 and saving. **9.** *(1)* The Maharashtra Medicare Service Persons and Medicare Service Institutions (Prevention of Violence and Damage or Loss to Property) Ordinance, 2010, is hereby repealed. Mah. Ord. I of 2010.

*(2)* Notwithstanding such repeal, anything done or any action taken (including any notification or order issued) under the said Ordinance, shall be deemed to have been done, taken or issued, as the case may be, under the corresponding provisions of this Act.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.